# Computer आणि प्रेम

जन्म झाला computerचा
मानवाच्या प्रगतीसाठी
Computerच्या desktopवरती
होती प्रेमिकांच्या भेटीगांठी !

"Yeah"- "who" म्हणत email वरती
प्रेमिक संभाषण करती
facebookच्या फलकावरती
एकमेकां जवळून बघती !

कधीकधी ते साथी शोधती
उघडून shadi.com
आईवडील काळजीनं म्हणती
राम राम राम !

'घाबरू नका', मुले सांगती
'हेच आमचे काम
असे करून सर्व सुखी होती
Check on, Ask.com !'

ही कसली मानवाची प्रगती
ही तर आहे अधोगती
प्रेमिक जेव्हां एकमेकां भेटती
प्रीतीची त्यांना येई प्रचिती !

रीत जरी ही जुनी वाटली
जागवी ही खरी प्रीती
लैलामजनू होऊन तुम्ही
जागवा परत पुराण्या रीती!

**- डॉ. दीपक भोजराज** (होबार्ट, इंडियाना)